
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे



आरक्षण उपवर्गीकरणावर हरकतींचा पाऊस

(पान २ वर)

।सोमवार, दि. २० एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक १५ ।पाने २।
DIGITAL EDITION

Selected

## तन्वी कोलते 'बिग बॉस जिंकली!

मुंबई : 'बिग बॉस मराठी'च्या सहाव्या सीझनचा शंभर दिवसांचा खेळ अखेर पूर्ण झाला आहे. यावर्षी तन्वी कोलते, राकेश बापट, अनुश्री माने, विशाल कोटियन आणि दिपाली सय्यद या पाच सदस्यांनी टॉप-५ मध्ये एन्ट्री घेतली होती. या पाचही जणांना संपूर्ण महाराष्ट्रातून भरभरून व्होटिंग करण्यात आलं. मात्र, अखेरीस या खेळात तन्वी कोलतेने बाजी मारली आहे. 'बिग बॉस मराठी ६'ची विजेती ठरली आहे तन्वी कोलते. तर राकेश बापट यंदाच्या सीझनचा उपविजेता ठरला आहे. तन्वीला हा शो जिंकल्यावर 'बिग बॉस मराठी'कडून ट्रॉफी आणि १५ लाखांचा चेक देण्यात आला आहे.यंदाच्या पर्वात 'बिग बॉस मराठी'च्या घरात प्रेक्षकांना 'काटा' आणि 'टोळी' असे दोन ग्रुप्स पाहायला मिळाले होते, आणि तन्वीने हा शो जिंकल्यामुळे 'काटा ग्रुप'ने या खेळात बाजी मारली आहे. ग्रँड फिनालेला आधी शोमधून एलिमिनेट झालेले सदस्य सुद्धा उपस्थित होते. तसेच 'राजा शिवाजी' सिनेमाच्या निमित्ताने यावर्षी ग्रँड फिनालेला जिनिलीया देशमुख व अभिषेक बच्चन हे दोन लोकप्रिय बॉलीवूड कलाकार देखील उपस्थित होते.

# सर्व वीज प्रकल्प अन् पूल उद्ध्वस्त करू

## डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला धमकी; शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीची केली घोषणा

जन सम्राट टाईम्स

मुंबई : अमेरिका-इराण युद्धावर कोणताही ठोस तोडगा अजूनही निघालेला नाही. ८ एप्रिल रोजी फक्त युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. पण सध्या होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीवरून अमेरिका-इराणमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानच्या माध्यमातून दोन्ही देशांत शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबरच्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीची घोषणा केली आहे. अमेरिकेचं शिष्टमंडळ उद्या (२० एप्रिल) संध्याकाळी चर्चेसाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादला रवाना होणार असल्याची माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. मात्र, ही माहिती देत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा धमकी दिली. 'इराणने जर आता करार केला नाही, तर आम्ही सर्वकाही उडवून देऊ, इराणधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि पूल उद्ध्वस्त करू, आता खूप झालं', असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे."इराणने शनिवारी होर्मुझच्या सामुद्रधुनीत गोळीबार केला. हे आमच्या शस्त्रसंधी कराराचं उल्लंघन आहे. यामध्ये अनेक गोळ्या एका फ्रेंच जहाजावर आणि यूकेच्या एका मालवाहू जहाजावर झाडण्यात आल्या. पण हे काही चांगलं नव्हतं, नाही का? आता माझे प्रतिनिधी उद्या (२० एप्रिल) संध्याकाळी चर्चेसाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादला जात आहेत", अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे."इराणने अलीकडेच सामुद्रधुनी बंद करण्याची घोषणा केली. हे खरंच विचित्र आहे. कारण आमच्या नाकेबंदीमुळे सामुद्रधुनी आधीच बंद झाली आहे. त्यामुळे ते खरंतर नकळतपणे आम्हाला मदत करत आहेत आणि या सामुद्रधुनीच्या बंदमुळे होणारं नुकसान त्यांचंच आहे. जे दररोज ५०० दशलक्ष



डॉलर्सपेक्षा जास्त असावं. यात अमेरिकेचं कोणतंही नुकसान होत नाही", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे."खरं तर अनेक जहाजं सध्या आयआरजीसीच्या (IRGC) सौजन्याने माल भरण्यासाठी अमेरिका, टेक्सास, लुइझियाना आणि अलास्काकडे जात आहेत. मात्र, आयआरजीसीला नेहमीच स्वतःला 'कणखर' म्हणून दाखवायचं असतं. आता आम्ही एक अतिशय न्याय्य आणि वाजवी प्रस्ताव देत आहोत आणि मला आशा आहे की ते (इराण) तो स्वीकारतील. कारण जर त्यांनी तो स्वीकारला नाही, तर अमेरिका इराणमधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि प्रत्येक पूल उद्ध्वस्त करेल. आता पुरे झालं", अशी धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली."इराणचे प्रतिनिधी देखील लवकरच करारावर सहमत होतील आणि जर ते सहमत झाले नाही, तर जे आवश्यक आहे ते करणं माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट असेल. जे इतर राष्ट्राध्यक्षांनी गेल्या ४७ वर्षांपासून इराणविरुद्ध करायला हवं होतं. आता इराणच्या संहारक यंत्रणेचा अंत करण्याची वेळ आली आहे", असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.नच्या माध्यमातून दोन्ही देशांत शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबरच्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीची घोषणा केली आहे.

अमेरिकेचं शिष्टमंडळ उद्या (२० एप्रिल) संध्याकाळी चर्चेसाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादला रवाना होणार असल्याची माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. मात्र, ही माहिती देत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा धमकी दिली. 'इराणने जर आता करार केला नाही, तर आम्ही सर्वकाही उडवून देऊ, इराणधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि पूल उद्ध्वस्त करू, आता खूप झालं', असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे."इराणने शनिवारी होर्मुझच्या सामुद्रधुनीत गोळीबार केला. हे आमच्या शस्त्रसंधी कराराचं उल्लंघन आहे. यामध्ये अनेक गोळ्या एका फ्रेंच जहाजावर आणि यूकेच्या एका मालवाहू जहाजावर झाडण्यात आल्या. पण हे काही चांगलं नव्हतं, नाही का? आता माझे प्रतिनिधी उद्या (२० एप्रिल) संध्याकाळी चर्चेसाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादला जात आहेत", अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे."इराणने अलीकडेच सामुद्रधुनी बंद करण्याची घोषणा केली. हे खरंच विचित्र आहे. कारण आमच्या नाकेबंदीमुळे सामुद्रधुनी आधीच बंद झाली आहे. त्यामुळे ते खरंतर नकळतपणे आम्हाला मदत करत आहेत आणि या सामुद्रधुनीच्या बंदमुळे होणारं नुकसान त्यांचंच आहे. जे दररोज ५०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त असावं. यात अमेरिकेचं कोणतंही नुकसान होत नाही", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे."खरं तर अनेक जहाजं सध्या आयआरजीसीच्या (IRGC) सौजन्याने माल भरण्यासाठी अमेरिका, टेक्सास, लुइझियाना आणि अलास्काकडे जात आहेत.

### लवकरच करारावर सहमत होतील

आयआरजीसीला नेहमीच स्वतःला 'कणखर' म्हणून दाखवायचं असतं. आता आम्ही एक अतिशय न्याय्य आणि वाजवी प्रस्ताव देत आहोत आणि मला आशा आहे की ते (इराण) तो स्वीकारतील. कारण जर त्यांनी तो स्वीकारला नाही, तर अमेरिका इराणमधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि प्रत्येक पूल उद्ध्वस्त करेल. आता पुरे झालं", अशी धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली."इराणचे प्रतिनिधी देखील लवकरच करारावर सहमत होतील आणि जर ते सहमत झाले नाही, तर जे आवश्यक आहे ते करणं माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट असेल. जे इतर राष्ट्राध्यक्षांनी गेल्या ४७ वर्षांपासून इराणविरुद्ध करायला हवं होतं.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# महाराष्ट्रभर महापुरुषांच्या विचारांचा जागर!

## प्रशांत पवित्रे यांची निशुल्क प्रबोधन

जन सम्राट टाईम्स

**पुणे** : महाराष्ट्रभर महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी युवा व्याख्याते प्रशांत पवित्रे यांनी निशुल्क प्रबोधन मोहिम हाती घेतली असून या उपक्रमाला विविध स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. "आपणास जे जे कळे इतरांशी सांगूनी शहाणे करून सोडावे सकळ जनास" या संतवचनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत ही मोहीम राबविण्यात येत आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर साजऱ्या होणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम अधिक वेगाने राबवली जात आहे. खेडोपाडी तसेच शहरी भागात तरुणाईपर्यंत महापुरुषांचा खरा इतिहास, त्यांचे विचार आणि सामाजिक योगदान पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्रशांत पवित्रे आपल्या व्याख्यानांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दिलेली लोकशाही व्यवस्था, तसेच भारताविषयीचे त्यांचे दूरदर्शी विचार यावर सखोल मार्गदर्शन करतात. त्यांच्या संवादात्मक शैलीमुळे तरुणांमध्ये विचारप्रवृत्ती निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.



### समाज परिवर्तनाला चालना देणारे कार्यक्रम

ही मोहीम एखाद्या जिल्हा किंवा तालुक्यापुरती मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रभर राबवली जाणार असल्याचे पवित्रे यांनी स्पष्ट केले. विविध सामाजिक संघटना, चळवळीतील पदाधिकारी, विचारवंत तसेच बहुजन समाजातील तरुणांनी या प्रबोधनात्मक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. दरम्यान, जयंती उत्सवांच्या निमित्ताने होणाऱ्या डीजे, डॉल्बी किंवा रॅली यांसारख्या पारंपरिक कार्यक्रमांबरोबरच समाजपरिवर्तनाला चालना देणारे प्रबोधनात्मक कार्यक्रम अधिक प्रमाणात आयोजित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. "उत्सव साजरे करताना केवळ दिखाऊपणावर भर न देता समाजाला दिशा देणारे विचार पोहोचवणे महत्त्वाचे आहे.

# स्टब्सचा दमदार पाठलाग, दिल्लीची आरसीबीवर ६ गडी राखून मात

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील २६व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर ६ गडी राखून प्रभावी विजय मिळवत स्पर्धेत महत्त्वाची झेप घेतली. एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बेंगळुरू येथे १८ एप्रिल रोजी दुपारी ३:३० वाजता झालेल्या या सामन्यात आरसीबीने २० षटकांत १७५/८ धावांची अपेक्षित मोठी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात दिल्लीने १९.५ षटकांत १७९/४ धावा करत लक्ष्य गाठले. आरसीबीची सुरुवात आक्रमक झाली. फिल सॉल्टने ३८ चेंडूत ६३ धावांची प्रभावी खेळी करत डावाला वेग दिला. विराट कोहलीने १९ धावा करत साथ दिली, तर देवदत्त पडिक्कलने १८ धावांचे योगदान दिले. मधल्या षटकांत रजत पाटीदार, टिम डेव्हिड आणि जितेश शर्मा यांनी छोट्या पण उपयुक्त खेळी करत धावसंख्या पुढे नेली. शेवटच्या टप्प्यात क्रुनाल पंड्याने १२ धावा जोडत संघाला १७५ धावांपर्यंत पोहोचवले. दिल्लीकडून कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेत मधल्या षटकांत नियंत्रण मिळवले. लुंगी एनगिडीनेही २ बळी घेत प्रभावी साथ दिली.

शिस्तबद्ध आणि भेदक गोलंदाजीमुळे आरसीबीला आणखी मोठी धावसंख्या उभारता आली नाही.



१७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात डळमळीत झाली. पथुम निसांका, करुण नायर आणि समीर रिजवी हे तिघे लवकर बाद झाले. भुवनेश्वर कुमारने सुरुवातीलाच ३ बळी घेत दिल्लीला मोठ्या दबावाखाली आणले. त्या टप्प्यावर सामना आरसीबीच्या बाजूने झुकलेला दिसत होता. अशा परिस्थितीत केएल राहुलने ३४ चेंडूत ५७ धावांची संयमी आणि जबाबदार खेळी करत डाव सावरला. त्यानंतर ट्रिस्टन स्टब्सने ४७ चेंडूत ६० धावांची नाबाद खेळी साकारत सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला. राहुल–स्टब्स भागीदारीने डाव स्थिर केला आणि धावगती नियंत्रणात ठेवत दबाव कमी केला. सामन्याचा निर्णायक टप्पा १०व्या ते १५व्या षटकांदरम्यान दिसला. त्या काळात दिल्लीच्या फलंदाजांनी संयम राखत योग्य चेंडूंवर आक्रमण केले. शेवटच्या टप्प्यात कर्णधार अक्षर पटेलने २६ धावा करत महत्त्वाची साथ दिली. डेव्हिड मिलरने १० चेंडूत २२ नाबाद धावा करत शांतपणे विजयावर शिक्कामोर्तब केले. दिल्लीने चिन्नास्वामी स्टेडियमवर आत्मविश्वासपूर्ण पाठलाग पूर्ण केला. आरसीबीकडून भुवनेश्वर कुमारने ४ षटकांत २६ धावांत ३ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली. क्रुनाल पंड्याने १ बळी घेत साथ दिली. इतर गोलंदाजांना मात्र अपेक्षित यश मिळाले नाही, ही बाब निर्णायक ठरली. या सामन्यात काही महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. ट्रिस्टन स्टब्सचे नाबाद ६० धावांचे योगदान हे दबावाखालील सर्वोत्तम खेळींपैकी एक ठरले. दिल्लीने १७५ पेक्षा अधिक धावांचे लक्ष्य यशस्वीरीत्या पार करत या हंगामातील उल्लेखनीय पाठलागांपैकी एक नोंदवला.

# पाणीपुरवठा कोलमडला; पाईपलाईन फुटल्याने भटकंती

जन सम्राट टाईम्स

एरंडोल: तालुक्यातील कढोली येथील रिंगणगावमध्ये पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णपणे कोलमडली असून पाईपलाईन वारंवार फुटत असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गेल्या दोन दिवसांपासून गावात पाणीपुरवठा ठप्प झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पाणीटंचाईमुळे महिलांना, वृद्धांना आणि लहान मुलांना दूरवर जाऊन पाणी आणावे लागत आहे.

अनेक ग्रामस्थ विहिरींवर अवलंबून असून त्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या



अधिक गंभीर बनली आहे. संबंधित यंत्रणेकडून वेळेवर दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. ग्रामपंचायत कारभार ठप्प रिंगणगाव ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर अद्याप प्रशासक नियुक्त करण्यात आलेला नाही. तसेच ग्रामसेवकही वारंवार रजेवर असल्याने ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे ठप्प झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळेच समस्या अधिक तीव्र झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दूरवरून पाणीपुरवठा; अडचणी कायम गावाला पेयजल योजनेअंतर्गत दापोरी येथील गिरणा नदीकाठावरून, सुमारे तीन ते चार किलोमीटर अंतरावरून पाणीपुरवठा केला जातो.दुरुस्ती करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा एरंडोल पंचायत समितीवर मोर्चा काढण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

> "दापोरी येथून येणारी पाईपलाईन वारंवार फुटत असल्याने गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. सरपंच व ग्रामसेवक नसल्यामुळे अडचण अधिक वाढली आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल.
>
> **-भरत महाजन, ग्रामस्थ, रिंगणगाव**

# मालिंगा चमकला, हैदराबादची चेन्नईवर १० धावांनी थरारक मात

## हैदराबादने मैदानावर दबदबा दाखवला

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील २७व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्जवर १० धावांनी थरारक विजय मिळवत स्पर्धेत आपली पकड अधिक मजबूत केली. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, उप्पल, हैदराबाद येथे झालेल्या या लढतीत हैदराबादने २० षटकांत १९४/९ धावा केल्या. प्रत्युत्तरात चेन्नईला २० षटकांत १८४/८ धावांपर्यंतच मजल मारता आली. हैदराबादची सुरुवात आक्रमक झाली. अभिषेक शर्माने २२ चेंडूत ५९ धावांची तडाखेबाज खेळी करत पॉवरप्लेमध्येच सामन्याची दिशा ठरवली. ट्रॅव्हिस हेडने २३ धावांची उपयुक्त साथ दिली. मधल्या फळीत सलग विकेट्स पडल्याने डाव काहीसा डळमळीत झाला. त्या परिस्थितीत हेन्रिख क्लासेनने ३९ चेंडूत ५९ धावांची संयमी पण प्रभावी खेळी साकारत डाव सावरला. शेवटच्या टप्प्यात शिवांग कुमार आणि सलिल अरोरा यांनी महत्त्वाच्या धावा जोडत संघाला भक्कम धावसंख्येपर्यंत पोहोचवले. चेन्नईकडून अंशुल काम्बोज आणि जेमी ओव्हर्टन यांनी प्रत्येकी ३ बळी घेत प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या आक्रमक फलंदाजीमुळे लक्ष्य आव्हानात्मक ठरले. १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात वेगवान झाली, मात्र सातत्य राखता आले नाही. आयुष म्हात्रेने १३ चेंडूत ३० धावांची झटपट खेळी केली. मॅथ्यू शॉर्टने ३० चेंडूत ३४ धावा करत डाव टिकवण्याचा प्रयत्न केला. सरफराज खान आणि शिवम दुबे यांनी मधल्या षटकांत लढा दिला. आवश्यक धावगती हाताबाहेर गेली. हैदराबादकडून ईशन मालिंगा याने अचूक आणि प्रभावी गोलंदाजी करत ४ षटकांत २९ धावांत ३ बळी घेत सामन्याचा निर्णायक टप्पा आपल्या बाजूने वळवला. नितीश कुमार रेड्डीने २ बळी घेत महत्त्वाची साथ दिली. शेवटच्या षटकांत शिस्तबद्ध गोलंदाजीमुळे चेन्नईला लक्ष्य गाठता आले नाही. या सामन्यात काही महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. अभिषेक शर्माचा २२ चेंडूत ५९ धावांचा स्फोटक डाव हा या मोसमातील सर्वात वेगवान सुरुवातींपैकी एक ठरला. हैदराबादने २० षटकांत १९४ धावा करत घरच्या मैदानावर दबदबा दाखवला. ईशन मालिंगाचा ३/२९ हा या सामन्यातील सर्वात प्रभावी गोलंदाजी स्पेल ठरला. या विजयामुळे हैदराबादचा आत्मविश्वास उंचावला असून गुणतालिकेत त्यांनी वरच्या स्थानाकडे मजल मारली आहे. चेन्नईसमोर मात्र मधल्या षटकांतील गती आणि सातत्याचा अभाव ही समस्या पुन्हा अधोरेखित झाली आहे. आयपीएल २०२६ मध्ये रविवार, १९ एप्रिल रोजी होणाऱ्या सामन्यांकडे आता क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थानयांच्यात कोलकाता येथे सामना रंगणार आहे. कोलकाताला वरच्या स्थानासाठी सातत्याची गरज आहे. राजस्थानसाठी हा सामना प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी अत्यावश्यक ठरणार आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# एरंडोल तालुक्यात दलित वस्तींसाठीच्या निधी खर्चाकडे दुर्लक्ष

## १५ टक्के तरतूद कागदावरच; ग्रामसेवकांवर कारवाईची आरपीआयची मागणी

जन सम्राट टाईम्स

खेडी कढोली : एरंडोल तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींकडून दलित वस्तींसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या १५ टक्के निधीच्या वापराकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या एकूण निधीपैकी १५ टक्के रक्कम मागासवस्तीच्या विकासकामांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात ही तरतूद अनेक ठिकाणी केवळ कागदोपत्रीच राहिल्याची तक्रार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आरपीआय) वतीने गट विकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मूलभूत सुविधांचा अभाव; नागरिक त्रस्त तालुक्यातील कढोलीसह अनेक गावांतील दलित वस्त्यांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, गटारी स्वच्छता, पथदिवे यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव कायम असल्याचे निदर्शनास आले आहे. विकासकामे रखडल्यामुळे स्थानिक नागरिकांना रोजच्या जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित विभागाकडून प्रभावी देखरेख होत




नसल्याने ही समस्या अधिकच गंभीर बनत असल्याचे आरपीआयने नमूद केले आहे. चौकशी करून कठोर कारवाईची मागणी या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून निधीचा योग्य वापर होत आहे की नाही, याची सखोल चौकशी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ग्रामसेवक व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही आरपीआयच्या वतीने देण्यात आला आहे. अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण यासंदर्भात गटविकास अधिकारी डी. ई. जाधव यांनी सांगितले की, "ज्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नाहीत, त्या ठिकाणी १५ टक्के निधी खर्च करण्यात आलेला आहे. काही ग्रामपंचायतींवर प्रशासक असल्यामुळे निधी खर्चावर मर्यादा आल्या. तरीही अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांसाठी निधीचा वापर करण्यात आला आहे." आरपीआयची भूमिका ठाम दरम्यान, आरपीआयचे तालुका अध्यक्ष सुनील खोकरे यांनी स्पष्टपणे सांगितले की, "तालुक्यातील काही ग्रामपंचायतींनी गेल्या दोन ते तीन वर्षांपासून दलित वस्तीसाठी राखीव निधी खर्च केलेला नाही.

### राखीव निधीचा प्रश्न गंभीर बनला

सचिव देवानंद बिहेरी, उपप्रमुख राजेंद्र सोनवणे, संपर्कप्रमुख सिताराम मराठे, सरचिटणीस गजानन पाटील यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. एकंदर, एरंडोल तालुक्यात मागासवस्तीत विकासासाठी राखीव निधीचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

Selected

## महिला आरक्षण विधेयकावरून राज्यात कलगीतुरा...

मुंबई : देशाच्या संसदेत नामंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकावरुन राज्यातील महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये कलगीतुरा सुरु होता. राज्यातील लाडक्या बहीणींनी महाविकास आघाडीला धडा शिकवला आहे. आता देशातील लाडक्या बहीणी इंडिया आघाडीला धडा शिकवतील, असे भाकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. 'खासदारांची संख्या वाढवून सत्तेचा अमरपट्टा कायम ठेवण्याचे भाजपचे षडयंत्र विरोधकांनी उधळून लावले. मोदी यांना खोटे बोलण्याचा आजार झाला आहे, अशी बोचरी टीका शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी केली. महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाले. त्यानंतर राज्यातील महायुती, महाविकास आघाडीतील नेत्यांच्यात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. प्रमुख नेत्यांच्या टीका टिप्पणीनंतर आता दुसऱ्या फळीतील नेत्यांनी टीकेची धार कायम ठेवली आहे. महिला आरक्षण विधेयक हे एक राजकीय षडयंत्र होते. ते कोसळले. मोदी आणि त्यांच्या मंडळाच्या घसरणीची ही सुरुवात आहे. १६ खासदारांच्या जोरावर मोदी यांचे पंतप्रधान पद टिकले आहे.. भाषणाविरोधात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार झाल्यानंतर विरोधकांच्या पायाच्या खालची वाळू सरकली आहे,असे सांस्कृतिक मंत्री ॲड अशिष शेलार यांनी म्हटले आहे. काँग्रेस आघाडीने महिलांचा अपमान केला आहे, असा आरोप महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला..

# आरक्षण उपवर्गीकरणावर हरकतींचा पाऊस

## राज्य सरकारची सुनावणी लांबणार... आंबेडकरी संघटनांनी केले आवाहन?

जन सम्राट टाईम्स



**मुंबई** : अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने भूमिका मांडण्यासाठी आंबेडकरी संघटनांनी समाज माध्यमावर आवाहन केले आहे. परिणामी, यासंदर्भात शासनाकडे हरकतींचा पाऊस येण्याची शक्यता असून सुनावणीसाठी गठीत केलेल्या समितीची पंचाईत होणार आहे. न्या. अनंत बदर (निवृत्त) यांची राज्य सरकारने उपवर्गीकरण करण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्ये एकसदस्य समिती नेमली होती. १६ मार्च रोजी समितीने शासनाला अहवाल सादर केला. दरम्यान उपवर्गीकणासंदर्भात काही हरकती शासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्यावर सुनावणी घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यांची समिती गठीत केली आणि १५ एप्रिलपर्यंत हरकती मागवल्या होत्या. १७ व १८ एप्रिल रोजी त्यावर सुनावणी होणार होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीमध्ये समाज व्यग्र असताना त्या दरम्यान जाणीवपूर्वक हरकती व सुनावणी ठेवली आहे, असा आरोप झाला होता. अखेर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या आग्रहामुळे हरकतींची मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली. उप वर्गीकरणासंदर्भात शासनाला हरकती पाठवण्याचे जयंतीच्या कार्यक्रमात अनेक ठिकाणी आवाहन करण्यात आले. तसेच समाज माध्यमावर आवाहन करण्यात येत आहे.हरकती पाठवण्याचा मसुदा व ई-मेलची माहिती दिली जात आहे. त्यामुळे शासनाकडे हरकतींची संख्या काही हजरांच्या घरात जाऊ शकते. अनुसूचित जातींना राज्यात १३ टक्के आरक्षण आहे. हे आरक्षण ५९ जातींमध्ये विभागले जाणार आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने भूमिका मांडण्यासाठी आंबेडकरी संघटनांनी समाज माध्यमावर आवाहन केले आहे. इतर मागास वर्ग आरक्षणाप्रमाणे त्यामध्ये अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यात येणार आहे. नवबौद्धांचा उपवर्गीकणास विरोध असून मातंग समाजाने ही मागणी लावून धरली आहे. न्या. अनंत बदर (निवृत्त) यांची राज्य सरकारने उपवर्गीकरण करण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्ये एकसदस्य समिती नेमली होती. १६ मार्च रोजी समितीने शासनाला अहवाल सादर केला. दरम्यान उपवर्गीकणासंदर्भात काही हरकती शासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्यावर सुनावणी घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यांची समिती गठीत केली आणि १५ एप्रिलपर्यंत हरकती मागवल्या होत्या. न्या. बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करा आणि विविध जातींच्या नेत्यांशी यासदंर्भात चर्चा करा, २०२१ लांबलेली जनगणना पूर्ण झाल्यावर त्या आकडेवारीवर उपवर्गीकरणाचा निर्णय घ्या, अशी आंबेडकरी समाजातून मागणी होत आहे.


### फूट पाडण्याचा आरोप

राज्यातील महायुती सरकारला अनुसूचित जातींमध्ये फूट पाडायची आहे. त्यासाठी मातंगांना हाताशी धरुन हे आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात येत आहे. सरकारकडे अनुसूचित जातींची नेमकी आकडेवारी नाही. कोणताही सांख्यिकी आधार नसताना सरकार उपवर्गीकरण करत आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या पद्धतीच्या विरोधात आहे, अशी टीका आंबेडकरी कार्यकर्ते करत आहेत.

# पोलिस निरीक्षक पवन देसले चोपडा शहर पोलिस ठाण्याचे प्रभारी

## साळवे यांची नियंत्रण कक्षात बदली; गायकवाड वाहतूक शाखेत, वादग्रस्त घटनांची पार्श्वभूमी

जन सम्राट टाईम्स





जळगाव (प्रतिनिधी): जळगाव शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक पवन देसले यांची चोपडा शहर पोलिस स्टेशन येथे बदली करण्यात आली असून त्यांनी प्रभारी पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातील संजय गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, चोपडा येथील काही वादग्रस्त घटनांच्या पार्श्वभूमीवर ही बदली झाल्याची चर्चा रंगली आहे. माजी पोलिस निरीक्षक मधुकर साळवे यांची चोपडा शहर येथून नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. चोपडा शहरात गोरक्षक आणि गोतस्कर यांच्यात झालेल्या वादानंतर साळवे यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. या प्रकरणी हिंदुत्ववादी संघटनांनी मोर्चा काढत त्यांच्या निलंबनाची मागणीही केली होती. दरम्यान, पवन देसले यांनी चोपडा शहर पोलिस स्टेशनचा कार्यभार स्वीकारला असला, तरी संजय गायकवाड यांनी अद्याप वाहतूक शाखेचा पदभार स्वीकारलेला नाही. ते लवकरच जबाबदारी स्वीकारणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# डॉ. राजेश दोशी यांची 'बीआयए'च्या अध्यक्षपदी

## एमएसएमई जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प

जन सम्राट टाईम्स



मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : देशातील प्रतिष्ठित उद्योग संघटनांपैकी एक असलेल्या बॉम्बे इंडस्ट्रीज असोसिएशन (बीआयए) च्या ६२ व्या अध्यक्षपदी डॉ. राजेश दोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डायगोल्ड क्रिएशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक असलेल्या डॉ. दोशी यांनी शनिवारी सायंकाळी मुंबईतील हॉटेल सहारा स्टार येथे दिमाखदार सोहळ्यात सूत्रे स्वीकारली. मावळते अध्यक्ष हितेश शहा यांनी डॉ. दोशी यांच्याकडे संघटनेची सूत्रे सोपवली. या सोहळ्यात उद्योजक, सरकारी अधिकारी आणि परदेशी राजदूतांच्या उपस्थितीत 'एमएसएमई' क्षेत्राच्या विकासासाठी एक ठोस कृती आराखडा मांडण्यात आला. डॉ. राजेश दोशी यांनी आगामी वर्षासाठी 'उठा, जागे व्हा, साध्य करा' (अराईज, अवेक, अचिव्ह) ही संकल्पना मांडली. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) स्वीकारणे, जागतिक पुरवठा साखळीत स्थान मिळवणे आणि निर्यात बाजारपेठा काबीज करणे, या तीन मुद्द्यांना प्राधान्य दिले आहे. मुख्य अतिथी अनिश दमानिया (जेएम फायनान्शियल) यांनी सांगितले की, देशाच्या एकूण निर्यातीत ४८% वाटा देणाऱ्या एमएसएमई क्षेत्रावरच देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. त्यांनी भांडवली शिस्त आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले. मुख्य अतिथी सुरेंद्रकुमार टिब्रेवाला (फाईनोटेक्स केमिकल) यांनी 'लहान सुरुवात करून मोठी स्वप्ने पाहण्याचा' सल्ला दिला. यश मिळवण्यासाठी 'अधिकार सोपवणे' (डीलीगेशन) आणि संशोधनावर (आर अँड डी) भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या अनुभवातून सांगितले.

### जागतिक बाजारपेठेचे प्रवेशद्वार बनणार

या सोहळ्यात बीआयएच्या 'आंत्रप्रेन्युअर' या पुनरुज्जीवित नियतकालिकाचे मुखपृष्ठ प्रकाशित करण्यात आले आणि महत्त्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. एकूणच, "बीआयए केवळ नेटवर्किंगचे व्यासपीठ न राहता ते आता सूक्ष्म आणि लघु उद्योजकांसाठी विकासाचे इंजिन आणि जागतिक बाजारपेठेचे प्रवेशद्वार बनणार आहे."

# लोकशाहीच्या विस्ताराचा कसोटी क्षण!

गुरुदत्त दिनकर वाकदेकर
मुंबई

भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य तिच्या व्यापकतेत आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनात स्पष्टपणे दिसून येते. प्रत्येक नागरिकाचा आवाज शासनापर्यंत पोहोचावा, ही या व्यवस्थेची मूलभूत भावना आहे. मतदारसंघांचे सीमांकन ही त्या भावनेची व्यावहारिक अंमलबजावणी मानली जाते. १९७६ पासून लोकसंख्येच्या आधारे जागांचे पुनर्वाटप स्थगित ठेवण्यात आले होते. लोकसंख्या वाढत राहिली, परंतु प्रतिनिधित्वाचा आराखडा दीर्घकाळ स्थिर राहिला. २०२६ नंतर सीमांकनाची प्रक्रिया पुन्हा सुरू होण्याची घटनात्मक तरतूद आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिनिधित्वाचा पुनर्विचार अपरिहार्य ठरतो. बदलत्या लोकसंख्येचा प्रभाव राजकीय रचनेवर उमटणे स्वाभाविक आहे.
लोकशाहीची जिवंतता तिच्या बदल स्वीकारण्याच्या क्षमतेत दडलेली असते. त्यामुळे नव्या वास्तवाशी जुळवून घेणे गरजेचे ठरते. तथापि, हा बदल केवळ आकड्यांच्या वाढीत मर्यादित राहू नये. प्रतिनिधीसंख्या वाढली म्हणून लोकांचा सहभाग आपोआप वाढेलच असे नाही. न्याय्य आणि संतुलित प्रतिनिधित्व अधिक महत्त्वाचे ठरते. विविध प्रदेश, समाजघटक आणि गरजा यांचा समतोल राखणे आवश्यक असते.
लोकसंख्येचे प्रमाण हा एकमेव निकष ठरू शकत नाही. सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक घटकांचाही सखोल विचार आवश्यक ठरतो. अन्यथा काही भागांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ शकते. लोकशाहीत विश्वास टिकवणे ही सर्वात मोठी जबाबदारी असते. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखली गेली पाहिजे. नागरिकांना बदलांचे स्वरूप स्पष्टपणे समजले पाहिजे. सार्वजनिक चर्चेला पुरेसा वाव मिळाला पाहिजे. केवळ धोरण जाहीर करणे पुरेसे नसते. त्यामागील उद्देश स्पष्ट करणे अधिक आवश्यक असते. नागरिकांचा सहभाग वाढवणे हीच लोकशाहीची खरी कसोटी ठरते. प्रतिनिधित्वाचा विस्तार हे एक साधन ठरू शकते. परंतु त्या मागील विचार उत्तरदायी आणि स्पष्ट असला पाहिजे.
संख्यात्मक वाढ हे अंतिम उद्दिष्ट नसते. गुणवत्तात्मक सुदृढता आणि उत्तरदायित्व यांवरच लोकशाहीची खरी उभारणी होते. लोकशाहीचा विस्तार तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा तो न्याय, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मूल्यांवर उभा राहतो. लोकसभेच्या जागांमध्ये संभाव्य वाढ या विषयावर विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. सध्याची संख्या ५४३ आहे. भविष्यात ती वाढू शकते, असे संकेत तज्ज्ञांकडून व्यक्त होतात. मात्र नेमका आकडा अद्याप अधिकृतरीत्या निश्चित झालेला नाही. त्यामुळे या विषयाकडे शक्यतांच्या दृष्टीने पाहणे अधिक योग्य ठरते. राज्य विधानसभांमध्येही फेरबदल अपेक्षित आहेत. लोकसंख्येच्या बदलत्या वितरणाचा परिणाम प्रतिनिधित्वावर होणे स्वाभाविक आहे. काही भागांमध्ये मतदारसंख्या झपाट्याने वाढली आहे. काही भागांमध्ये ती तुलनेने स्थिर राहिली आहे. या असमतोलामुळे प्रतिनिधित्वाचा समतोल बिघडण्याची शक्यता निर्माण होते. सीमांकन प्रक्रियेमुळे मतदारसंघांचे आकार आणि सीमा बदलू शकतात. काही ठिकाणी नवीन मतदारसंघ निर्माण होतील. काही ठिकाणी विद्यमान सीमांमध्ये बदल होतील. या बदलांचा परिणाम निवडणूक राजकारणावर होणार आहे. स्थानिक नेतृत्वाचे समीकरण बदलू शकते. नागरिकांच्या अपेक्षा नव्याने आकार घेऊ शकतात. त्यामुळे हा विषय केवळ आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही. तो व्यापक सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा भाग बनतो. या प्रक्रियेमुळे उत्सुकतेसोबतच संभ्रमही निर्माण होतो. माहितीचा अभाव असेल तर गैरसमज वाढतात. म्हणूनच अधिकृत आणि स्पष्ट माहिती देणे अत्यावश्यक ठरते. पारदर्शकतेचा अभाव विश्वासाला तडा देऊ शकतो. शासनाने संवाद वाढवणे आवश्यक आहे. तज्ज्ञांचे मत, अधिकृत अहवाल आणि सार्वजनिक चर्चा यांचा समन्वय आवश्यक ठरतो. लोकसभा अधिवेशनांच्या अधिकृत नोंदींनुसार वर्षभरात सरासरी ६० ते ७० दिवस संसदीय कामकाज चालते, तर उर्वरित काळ समित्या आणि प्रशासकीय प्रक्रिया सक्रिय असतात. त्यामुळे संख्यावाढीसोबत कार्यक्षमतेत गुणात्मक सुधारणा होणे अपेक्षित आहे. लोकशाहीतील कोणताही मोठा बदल संयमाने समजून घेणे आवश्यक असते. योग्य नियोजन आणि प्रभावी संवाद यांमुळेच हा बदल सकारात्मक ठरू शकतो. संघराज्य व्यवस्थेतील समतोल हा सीमांकन प्रक्रियेतील सर्वात संवेदनशील घटक ठरतो. विविध राज्यांमध्ये लोकसंख्येची वाढ समान प्रमाणात झालेली नाही. काही राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रभावी धोरणे राबवली आहेत. काही राज्यांमध्ये मात्र वाढीचा वेग अधिक राहिला आहे. या असमतोलाचा परिणाम प्रतिनिधित्वावर होऊ शकतो. लोकसंख्या जास्त असलेल्या भागांना अधिक जागा मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे नियंत्रण राखणाऱ्या राज्यांना तुलनेने कमी प्रतिनिधित्व मिळू शकते. ही परिस्थिती त्या राज्यांसाठी अन्यायकारक वाटू शकते. दीर्घकालीन धोरणांचे परिणाम राजकीय प्रतिनिधित्वात दिसले नाहीत तर असंतोष वाढू शकतो. संघराज्य व्यवस्थेत सर्व घटकांना न्याय मिळणे आवश्यक असते. प्रादेशिक संतुलन ढासळल्यास राष्ट्रीय एकात्मतेवर परिणाम होऊ शकतो. सीमांकन करताना केवळ लोकसंख्येचा विचार पुरेसा ठरत नाही. सामाजिक रचना, आर्थिक स्तर आणि भौगोलिक वैशिष्ट्ये यांचाही विचार करावा लागतो. ग्रामीण आणि शहरी भागांतील विषमता लक्षात घेणे आवश्यक आहे. दुर्गम भागांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. अन्यथा त्यांच्या समस्या दुर्लक्षित राहू शकतात. विविध भाषिक आणि सांस्कृतिक घटकांचा समतोल राखणेही आवश्यक ठरते. लोकशाहीची ताकद तिच्या विविधतेत असते. त्यामुळे प्रत्येक घटकाला योग्य स्थान मिळाले पाहिजे. पारदर्शक प्रक्रिया गैरसमज कमी करते. तज्ज्ञ समित्यांचे अहवाल सार्वजनिक केले पाहिजेत. सर्व पक्षांचा सहभाग आवश्यक आहे. सहमती निर्माण झाली तर बदल सहज स्वीकारले जातात. परस्पर विश्वास टिकवणे हीच संघराज्य व्यवस्थेची खरी ताकद आहे. याचे ऐतिहासिक उदाहरण २००८ मधील काही राज्यांच्या पुनर्रचनेदरम्यान दिसून आले, जिथे स्थानिक असंतोष आणि चर्चेनंतरच निर्णय अधिक स्वीकारार्ह



ठरले. आर्थिक परिणामांचा विचार केला तर या प्रक्रियेचे गांभीर्य अधिक स्पष्ट होते. प्रतिनिधीसंख्या वाढल्यास सार्वजनिक खर्च वाढणे अपरिहार्य ठरते. खासदार आणि आमदारांना वेतन, भत्ते आणि विविध सुविधा दिल्या जातात. मूलभूत वेतनापेक्षा पूरक खर्च अधिक असतो. कार्यालयीन व्यवस्था, कर्मचारी, प्रवास आणि सुरक्षा यासाठी मोठा निधी खर्च होतो. नवीन सदस्य वाढल्यास हा खर्च वाढणारच आहे. संसद आणि विधानसभांसाठी अतिरिक्त पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. निवास, कार्यालये आणि तांत्रिक साधनांसाठी गुंतवणूक आवश्यक ठरते. हा सर्व खर्च सार्वजनिक तिजोरीतून होतो. त्यामुळे आर्थिक नियोजन अत्यंत काटेकोर असले पाहिजे. अनावश्यक खर्च टाळणे आवश्यक ठरते. आर्थिक शिस्त राखली नाही तर इतर क्षेत्रांवर परिणाम होतो. शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा यांसाठी निधी कमी पडू शकतो. त्यामुळे प्राधान्यक्रम बदलण्याचा धोका निर्माण होतो. खर्चासोबत परिणामांचाही विचार आवश्यक आहे. कार्यक्षमता वाढली तर खर्च योग्य ठरतो. परिणाम दिसले नाहीत तर प्रश्न निर्माण होतात. म्हणूनच उत्तरदायित्व आवश्यक ठरते. आर्थिक पारदर्शकता विश्वास निर्माण करते. नागरिकांना निधीचा वापर समजला पाहिजे. नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (CAG) अहवालांमधून सार्वजनिक खर्चाच्या परिणामकारकतेवर वेळोवेळी निरीक्षणे नोंदवली जातात. नियमित अहवाल आणि स्वतंत्र लेखापरीक्षण आवश्यक आहे. गैरवापर टाळण्यासाठी कठोर नियम गरजेचे आहेत.
दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊनच आर्थिक निर्णय घेतले पाहिजेत. खर्च वाढवणे सोपे असते, परंतु त्याचे औचित्य सिद्ध करणे ही खरी जबाबदारी असते. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेचा विचार करताना निधीवाटपाचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. या योजनेअंतर्गत प्रत्येक खासदाराला दरवर्षी ठराविक निधी उपलब्ध करून दिला जातो. त्या निधीचा उपयोग स्थानिक पातळीवरील विकासकामांसाठी केला जातो. पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा निधी उपयुक्त ठरू शकतो. स्थानिक गरजांनुसार प्राधान्य ठरवण्याची संधी उपलब्ध होते. तरीही या निधीच्या वापराबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात. पारदर्शकतेचा अभाव आढळल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येतात. काही प्रकल्प अपूर्ण राहतात. काही ठिकाणी निधीचा प्रभाव मर्यादित राहतो. नियोजन आणि देखरेख कमी पडल्यास अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. काही अभ्यास अहवालांमध्ये निधीच्या पूर्ण वापराबाबत आणि प्रकल्पांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत काटेकोरपणा आवश्यक आहे. खर्चाची स्पष्ट नोंद ठेवणे गरजेचे आहे. नागरिकांना माहिती उपलब्ध झाली पाहिजे. सामाजिक लेखापरीक्षण प्रभावी ठरू शकते. नागरिकांचा सहभाग वाढल्यास कामांची गुणवत्ता सुधारते.
निधीचा उपयोग दीर्घकालीन गरजा लक्षात घेऊन केला पाहिजे. शाश्वत विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि जबाबदारीमुळे ही योजना प्रभावी ठरू शकते. काही राज्यांतील ग्रामपातळीवरील प्रकल्पांमध्ये लोकसहभागामुळे यशस्वी अंमलबजावणीचे सकारात्मक उदाहरणही दिसून आले आहे. करदात्यांच्या दृष्टीने या प्रक्रियेचे महत्त्व अत्यंत संवेदनशील आहे. नागरिक विविध करांद्वारे शासनाला आर्थिक बळ देतात. उत्पन्नकर, वस्तू व सेवा कर आणि इतर आकारणी यांतून मोठा निधी जमा होतो. हा निधी विकासासाठी वापरला जाईल, अशी अपेक्षा असते. मूलभूत सुविधा सुधाराव्यात, ही सर्वांची अपेक्षा असते. प्रतिनिधीसंख्या वाढल्यास प्रशासनिक खर्च वाढतो. त्या बदल्यात ठोस परिणाम दिसले पाहिजेत. अन्यथा असंतोष वाढतो. सामान्य नागरिक आपल्या कष्टाच्या उत्पन्नातून कर भरतो. त्याच्या अपेक्षा साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या असतात. पारदर्शकता आणि कार्यक्षमता या अपेक्षा केंद्रस्थानी असतात. निधीचा योग्य वापर झाला तर विश्वास दृढ होतो. अन्यथा संशय निर्माण होतो. कर हा केवळ आर्थिक व्यवहार नसतो. तो विश्वासाचा दुवा असतो. त्यामुळे प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी वापरला गेला पाहिजे. स्पष्ट धोरणे आणि कडक नियंत्रण आवश्यक आहे. नागरिकांचा सहभाग वाढल्यास उत्तरदायित्व वाढते. शासनाने करदात्यांना भागीदार म्हणून पाहिले पाहिजे. करदात्यांचा विश्वास गमावला तर कोणतीही व्यवस्था टिकू शकत नाही; म्हणूनच प्रत्येक निर्णय त्यांच्या हिताच्या कसोटीवर तपासला गेला पाहिजे.
लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमता आणि उत्तरदायित्वाचा प्रश्न या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. संसदेचे आणि विधानसभांचे कामकाज मर्यादित दिवसांमध्ये पार पडते. त्या काळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. प्रत्येक सदस्याचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो. प्रत्यक्षात सहभागामध्ये मोठी तफावत दिसते. काही सदस्य प्रभावी काम करतात. काहींचा सहभाग मर्यादित राहतो. त्यामुळे संख्यावाढ केल्याने कार्यक्षमता वाढेलच असे नाही. उलट व्यवस्थापन अधिक गुंतागुंतीचे होऊ शकते. चर्चेची गुणवत्ता टिकवणे आवश्यक असते. विधेयकांवर सखोल चर्चा होणे गरजेचे आहे. समिती व्यवस्था मजबूत करणे हा प्रभावी उपाय ठरू शकतो. संशोधन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून दिल्यास निर्णय अधिक परिपक्व होतात. प्रशिक्षणामुळे कार्यक्षमता सुधारते. उत्तरदायित्व वाढवणे अत्यावश्यक आहे. लोकशाहीचा दर्जा प्रतिनिधींच्या कार्यावर अवलंबून असतो. संख्या नव्हे, तर गुणवत्ताच लोकशाहीचे खरे बळ ठरते आणि त्यावरच तिचे भविष्य अवलंबून असते. माध्यमे आणि सार्वजनिक संवाद यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. लोकशाहीत माहितीचा मुक्त प्रवाह आवश्यक असतो. नागरिकांना विश्वासार्ह माहिती मिळाली पाहिजे. मोठ्या बदलांच्या वेळी माध्यमांची जबाबदारी वाढते. तथ्यांची पडताळणी आवश्यक असते. चुकीची माहिती गोंधळ निर्माण करते. संतुलित चर्चा आवश्यक असते. तज्ज्ञांचे मत समोर आले पाहिजे. नागरिकांनीही माहिती चिकित्सकपणे तपासली पाहिजे. डिजिटल माध्यमांमुळे माहिती जलद पसरते. त्याचवेळी चुकीची माहितीही वेगाने पसरते. शासनाने संवाद साधला पाहिजे. पारदर्शकता विश्वास वाढवते. माहिती दडपल्यास संशय वाढतो. सार्वजनिक चर्चेला प्रोत्साहन आवश्यक आहे. जागरूक नागरिक लोकशाहीला बळ देतात. जबाबदार माध्यमे आणि सजग नागरिक यांच्या संयोगातूनच लोकशाहीतील संवाद अधिक परिपक्व बनतो.
लोकशाहीचा खरा अर्थ केवळ प्रतिनिधी वाढवणे नसतो, तर जनतेच्या अपेक्षांची प्रामाणिक पूर्तता करणे हा तिचा केंद्रबिंदू असतो. सीमांकन आवश्यक आहे, परंतु त्याची अंमलबजावणी संवेदनशीलतेने झाली पाहिजे. प्रत्येक निर्णयामागे सामाजिक समतोल, आर्थिक जबाबदारी आणि प्रामाणिकता असली पाहिजे. संख्यावाढ हे साधन आहे. परिणामकारकता हे उद्दिष्ट आहे. नागरिकांचा विश्वास जपणे सर्वात महत्त्वाचे आहे. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अनिवार्य आहेत. सार्वजनिक लेखापरीक्षण बंधनकारक करणे आवश्यक आहे. निधी वापराची डिजिटल पारदर्शकता वाढवली पाहिजे. प्रतिनिधींच्या कामगिरीचे वार्षिक मूल्यमापन जाहीर झाले पाहिजे. जागरूक नागरिक आणि उत्तरदायी शासन यांच्या समन्वयातूनच लोकशाही सक्षम होते. लोकशाहीचा विस्तार तेव्हाच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो, जेव्हा तो जनहित, न्याय आणि विश्वास या त्रिसूत्रीवर उभा राहतो.